# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र. ०७१२–२५६५१४५/१४६ E-mail:ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

Web Site : rdtenagpur.org.in


अति तात्काळ

क्रमांक :– तंशिस/प्राकाना/शैवि–३/संलग्नीकरण/२०१४/1668

दिनांक : 27 MAY 2014

प्रति,

संचालक/प्राचार्य

सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था

नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :– व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना संलग्नीकरण तसेच मान्यतेची माहिती सादर करण्याबाबत.**

**संदर्भ :– मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१४/१०५२, दि. २३ मे २०१४.**

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणास कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१४–१५ करीता व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश करावयाचे असल्यास संस्थेला विद्यापीठाचे संलग्नीकरणाचे आदेश अनिवार्य करण्यांत आलेले आहेत. काही संस्थांना तात्पुरते संलग्नीकरण अथवा अटींच्या अधीन राहून संलग्नीकरण देण्यांत आले असल्यास अशा संस्थेचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यांत येणार नाही. तसेच ज्या संस्थांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यापिठाकडून ज्या अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०१४–१५ करीता संलग्नीकरण दिलेले आहे अशाच अभ्यासक्रमाचा समावेश करण्यांत येईल. ज्या संस्थेनी अभ्यासक्रम, विद्याशाखा व मंजूर प्रवेश क्षमता या सर्व घटकांना विद्यापीठाचे संलग्नीकरणाचे आदेश प्राप्त झाले असल्यास संस्थांनी सदरहू माहिती **User ID** आणि **Password** वापरून संचालनाच्या संकेतस्थळावर अपलोड केली असेल तर अशा संस्थांनी अपलोड केलेल्या माहितीची प्रत तसेच २०१४–१५ वर्षाकरीताचे मुळ संलग्नीकरण आदेश व एआयसीटीई चे मान्यता पत्र घेवून सहसंचालक, तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांचे कार्यालयात दि. ०९.०६.२०१४ ते दि. १५.०६.२०१४ पर्यंत प्रमाणित करून घ्यावे. (सोबत वरील संदर्भिय पत्राची प्रत सोबत जोडण्यांत येत आहे.)

**सहपत्र : वरीलप्रमाणे**

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई (कार्यासन क्र. २अ) यांना माहितीस मानार्थ सादर.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २अ/एडीएम/२०१४/ १०५२

दिनांक : 23 MAY 2014

प्रति,

**सहसंचालक,**

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना संलग्नीकरण तसेच मान्यतेची माहिती सादर करण्याबाबत.

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्रमांक 2अ/एडीएम/2014/173, दिनांक 21.1.2014

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना विद्यापीठांचे संलग्नीकरण प्राप्त करून घेणे अनिवार्य करण्यात आले असून काही संस्थांना अटींच्या अधीन राहून अथवा तात्पुरते संलग्नीकरण देण्यात आल्यास अशा संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही असे संचालनालयाने यापूर्वीच कळविलेले आहे.

सर्व विद्यापीठांना त्यांच्या अधिकारक्षेत्रातील संस्थांना अंशत: अथवा अटी शर्तींच्या अधीन राहून संलग्नीकरणाची मान्यता न देता त्या संस्थांच्या अभ्यासक्रमनिहाय संलग्नीकरण प्रदान करण्यात आलेले आहे किंवा नाही हे स्पष्ट नमूद करण्यात यावे असे संचालनालयाने कळविलेले आहे. तसेच संस्थेला संलग्नीकरणाचे स्पष्ट आदेश असल्याशिवाय संस्थेचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही असेही विद्यापीठांना कळविण्यात आलेले आहे. सर्व विद्यापीठांना संलग्नीकरणाची प्रक्रिया दिनांक २०.६.२०१४ पर्यंत पूर्ण करण्यात यावी जेणेकरून संबंधित संस्था त्याची माहिती संचालनालयास सादर करतील असेही कळविण्यात आलेले आहे.

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत समावेश करण्यासाठी संस्थांना व आपल्या कार्यालयाकडून करावयाच्या कार्यवाहीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| संस्थांकडून अभ्यासक्रम(Course) विद्याशाखा (Branch) व मंजूर प्रवेश क्षमता (Intake) या सर्व घटकांना विद्यापीठाचे संलग्नीकरणाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संस्था User ID आणि Password वापरून अपलोड करणे | आदेश प्राप्त झाल्यापासून दिनांक १५.६.२०१४ पर्यंत |
| संस्थांनी संलग्नीकरणाची माहिती संकेतस्थळावर अपलोड केल्यानंतर विभागीय कार्यालयाकडून पडताळणी करणे | संस्थांनी अपलोड केल्या पासून दिनांक २०.६.२०१४ पर्यंत |
| संस्थांच्या संलग्नीकरणाची माहिती संकेतस्थळावर प्रमाणित केल्यानंतर ती एकत्रित माहिती विवरणपत्रात भरून संचालनालयास सादर करण्याचा दिनांक | दिनांक २४.६.२०१४ पर्यंत |

आपला,

(डॉ.सुभाष महाजन)

संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

D:\Budage\2014-15\Gen Correspondence\Affiliation\letter to BCUD and RO.docx